Reg. No. NP CITY/236/2018-20.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ४३] गुरुवार ते बुधवार, नोव्हेंबर २०-२६, २०२५/कार्तिक २९-अग्रहायण ५, शके१९४७ [पृष्ठे १६, किंमत : रुपये ११.००

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहे.**

# भाग एक-अ—नागपूर विभागीय पुरवणी

**(भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.**

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३२९.

**संचालक, नगर रचना, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

**आदेश**

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.बल्लारपूर-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-२-६४१२ :—

ज्याअर्थी, बल्लारपूर नगर परिषदेची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ (१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना टिपीएस-२२०२-१२६०-प्र.क्र.२ बी-२००४-नवि-९, दिनांक १६ ऑगस्ट, २००५ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे) भागशः मंजूर केली असून, ती दिनांक ०१ ऑक्टोबर, २००५ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त मंजूर विकास योजना" असे संबोधिलेली आहे) व वगळलेल्या भागाची विकास योजना, शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-२२०२-१२६०-प्र.क्र.२-(क)-२००४-नवि-०९, दिनांक १८ जून, २००८ अन्वये मंजूर असून, ती दिनांक २८ जुलै, २००८ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौ. बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथील स.क्र. ३२/९६ ही जमिन आरक्षण क्र. ३४ "दुकान केंद्र" (आरक्षणाचे एकूण क्षेत्र ०.२६ हे. आर . ) (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधले आहे) या आरक्षणाने बाधित होत असून, उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासासाठी नियोजन व समुचित प्राधिकरण नगर परिषद, बल्लारपूर आहे (यापुढे "उक्त समूचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमीन संपादीत केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणाखालील मौ. बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथील स.क्र. ३२/९६, १३०० चौ.मी. क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमीन" असे संबोधले आहे) संबंधित जमीनमालक यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधले आहे) उक्त अधिनियमाचे कलम -१२७(१) चे तरतुदीनुसार उक्त समूचित प्राधिकरणावर दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी सूचना (यापुढे "उक्त सूचना" असे संबोधले आहे) बजाविलेली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समूचित प्राधिकरणाने विहीत मूदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केली नाही अथवा, उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मा. उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर खंडपीठाकडून रिट याचिका क्र. ७३७६/२०२४ मध्ये दिनांक ०८ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या निर्णयात उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिनियमाच्या कलम १२७ चे तरतुदीन्वये व्यपगत झाल्याबाबत आदेश पारीत केले असून यानुषंगाने आदेश निर्गमित करणेबाबत सूचित केले आहे;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर व सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील अनुक्रमे पत्र क्र.२०८२, दिनांक १९ सप्टेंबर, २०२५ व पत्र क्र.१५८५, दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये सदर प्रकरणी, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीन्वयेचे आदेश निर्गमित करणेबाबत विहीत मार्गाने प्रस्ताव सादर केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीच्या १३०० चौ.मी. क्षेत्रावरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र. टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये समुचित प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा / नगर पंचायती / जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :—

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झाले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | (चौ.मी.) |
| १. | बल्लारपूर नगर परिषद, मौजा बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर | आरक्षण क्र. ३४ "दुकान केंद्र" एकूण अंदाजे क्षेत्र ०.२६ हे. आर | मौजा बल्लारपूर, ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर येथील स.क्र. ३२/९६ | १३०० |

**टीपः-** १. उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनीच्या लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकास उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, नगर परिषद, बल्लारपूर, जि. चंद्रपूर यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ३० ऑक्टोबर २०२५.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३०.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P-D.P.Ballarpur-Sec-127(2)-Order-TPV-II-6412-2025.–

Whereas, the Development Plan of Ballarpur Municipal Council has been Partly sanctioned as per the provisions of section 31*(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2202-1260-CR-2(B)-2004-UD-09,dated 16th August, 2005 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dt.01st October, 2005, (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan") and the Excluded Plan has been sanctioned in Urban Development Department *vide* Notification No. TPS-2202-1260-CR-2(C)-2004-UD-09, dated 18th June, 2008 & has come into force with effect from dated 28th July, 2008;

And whereas, as per the said Sanctioned Development Plan, the land bearing S.No. 32/96 of Mouza Ballarpur is affected by the Reservation Site No. 34, "Shopping Centre" (total area under reservation 0.26 Ha.) (hereinafter referred to as "the said Reservation") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Ballarpur (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the Lands affected by the said Reservation have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the land bearing S. No. 32/96 of Mouza Ballarpur admeasuring area approximately 1300 sq.mt. which is affected by the said Reservation (hereinafter referred to as "the said Land") had served a notice dt. 29th November, 2022 as per the provisions of section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 *(1)* of the said Act have been taken by the said Appropriate Authority within the stipulated period from the date of service of the said notice by the said land owner as per the provisions of Section 127 of the said Act ;

And whereas, the Hon'ble High Court, Mumbai, Nagpur Bench in the judgement dated 08th August, 2024 in Writ Petition No.7376/2024 has passed an order that, the reservation on the said land has lapsed under section 127 of the Said Act and directed to notify the lapsing of the reservation in accordance with law;

And whereas, the Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur and Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur *vide* letter No.2082, dt.19th September, 2025 and letter No.1585, dt.08th October, 2005 respectively have submitted report to issue an order under the provisions of section-127 *(2)* of the said Act, in the said matter in the prescribed manner;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127*(2)* of the said Act, regarding the lapsing of the said Reservation on the said land admeasuring area 1300 sq.mt.;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211-CR- 508-UD-13, dt. 01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 *(2)* of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now, therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said land as per the provisions of section 127*(2)* of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added:–

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council Mouza, Taluka and District | Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the Land | Approximate Area lapsed of the said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | | | (sq. mt.) |
| | Ballarpur Municipal Council, Mouza Ballarpur Tal. Ballarpur, Dist. Chandrapur. | Site No. 34, “Shopping Centre” Area 0.26 Ha. | S. No. 32/96 of Mouza Ballarpur, Tal. Ballarpur, Dist. Chandrapur | 1300 |

*Note:-* 1. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent Land under the said Sanctioned Development Plan.

2. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the areas of the said Land which are lapsed from the said Reservation is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Ballarpur, District Chandrapur during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website. *www.dtp.maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 30th October, 2025.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३१.

## संचालक, नगर रचना, यांजकडून

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

### आदेश

क्रमांक डि.टी.पी.-वि.यो.गोंदिया-कलम-१२७(२)-आदेश-टिपीव्ही-२-६५२५ :—

ज्याअर्थी, गोंदिया नगर परिषदेची विकास योजना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीनुसार शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना टिपीएस-२३११-२१८६-CR-२४९(बी)-२०२१-युडी-९, दिनांक ०४ एप्रिल, २०१२ अन्वये (यापुढे "उक्त अधिसूचना" असे संबोधिले आहे.) मंजूर केली असून, ती दिनांक १५ मे, २०१२ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे उक्त "मंजूर विकास योजना" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेनुसार, मौजा कुडवा येथील गट क्र. ५२९/२, ५२९/३, क्षेत्र १.५२ हे. या जमिनीपैकीचे क्षेत्र हे आरक्षण क्रमांक एन/२३ (प्राथमिक शाळा), १८ मी. व १२ मी. रुंद विकास योजना रस्ते या आरक्षणांनी बाधित होत असून (यापुढे "उक्त आरक्षण" असे संबोधिले आहे) उक्त आरक्षणाच्या भूसंपादन व विकासासाठी नियोजन व समूचित प्राधिकरण नगर परिषद, गोंदिया आहे (यापुढे "उक्त समुचित प्राधिकरण" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समूचित प्राधिकरणाने उक्त मंजूर विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणांखालील जमीन संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, उक्त आरक्षणांखालील मौजा कुडवा येथील गट क्र. ५२९/२, ५२९/३, क्षेत्र १.५२ हे. या जमिनीपैकी आरक्षित क्षेत्राबाबत (यापुढे "उक्त जमिनी" असे संबोधिले आहे) संबंधित जमीनमालक यांनी (यापुढे "उक्त जमीन मालक" असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम- १२७(१) चे तरतुदीनुसार उक्त समुचित प्राधिकरणावर दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी सूचना (यापुढे " उक्त सूचना " असे संबोधिले आहे) बजाविली होती व ती समुचित प्राधिकरणास दिनांक ०२ जानेवारी, २०२३ रोजी प्राप्त झाली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीनमालकांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त नियोजन प्राधिकरणाने विहीत मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमिनी संपादित केली नाही अथवा, उक्त जमिनींचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाचे कलम १२७ (१) चे तरतुदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगर रचना, गोंदिया शाखा, गोंदिया यांचेकडील पत्र क्र. ७४१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२५ अन्वये 'विकास योजना अंमलात आल्यापासून म्हणजे दिनांक १५ मे, २०१२ पासून १० वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जागा नियोजन प्राधिकरण न. प. गोंदिया ने संपादित करणे आवश्यक होते. तथापि, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७(१) अन्वये सदर जागा संपादित न झाल्याने अर्जदाराने कलम १२७ ची खरेदी सूचना दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी बजावलेली असल्याचे दिसून येते. खरेदी सूचना बजावल्यानंतर २४ महिन्याचे कालावधीत उक्त जागा नगर परिषदेने संपादित करणे आवश्यक होते. तथापि, नगर परिषदेने उक्त जागा संपादित केलेली नसल्याने त्याखालील आरक्षण व्यपगत झालेली आहे. सबब, कलम १२७ (२) नुसार आरक्षणाखालील जागा व्यपगत झाल्याबाबत शासनस्तरावरुन अधिसूचना निर्गमित करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.', असे कळविले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडील पत्र क्र. १६३९ दिनांक १६ ऑक्टोबर, २०२५ अन्वये अहवाल सादर करून अंतिमतः 'जमीन मालकीचे मौजा कुडवा येथील स.क्र. ५२९/२ व ५२९/३ चे एकूण क्षेत्रापैकी आरक्षण क्र. N/२३ (PS) "प्राथमिक शाळा" या आरक्षणाने बाधित जागेकरिता सूचना बजावल्यापासून २४ महिन्यांचे कालावधीमध्ये भूसंपादनाची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण झाली नसल्याने आरक्षण व्यपगत होत आहे. तथापि, १२.० मी. व १८.०० मी. रुंद वि.यो. रस्त्यामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनीच्या भागशः क्षेत्रामुळे उक्त रस्त्याची संलग्नता खंडित होत आहे. त्यामुळे दळणवळणाच्या व संलग्नतेच्या दृष्टीकोनातून उक्त मंजूर सुधारित विकास योजनेत विकास परवानगी देतांना रस्त्यांचे समन्वय साधने आवश्यक असल्याने, प्रस्तावित केलेले उक्त जमिनीमधील क्षेत्र हे रस्त्यासाठी कायम ठेवणे, अशी अट घालून; तसेच उक्त बाबत प्रशासक यांचा खुलासा प्राप्त करून घेऊन, उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्राकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १२७ (२) अन्वये अधिसूचना निर्गमित करणेबाबत संचालनालयाचे स्तरावरून निर्णय घेणे उचित होईल.', असे मत नमूद केले आहे;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद, गोंदिया यांचेकडुन प्राप्त मो. मा. क्र.२४४०/२०२१, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०२१ या पोटहिस्सा मोजणी 'क' प्रतीचे अवलोकन केले असता, मौ. कुडवा येथील गट क्र. ५२९/२ व ५२९/३ या जमिनींमधील क्षेत्र आरक्षण क्र. N - २३ (प्राथमिक शाळा) या आरक्षणाने, १२ मी. व १८ मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधित होत असल्याचे दिसून येतेः

–

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) वे तरतुदीनुसार उक्त जमिनीचे क्षेत्रावरील उक्त आरक्षण व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्रमांक टिपीएस-१८१३-३२११-प्र.क्र.५०८-नवि-१३, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती/जिल्हा परिषदा यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केले आहेत;

त्याअर्थी, आता, उक्त अधिनियमाचे कलम १२७ (२) चे तरतुदीनुसार संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर विकास योजनेतील उक्त जमिनींवरील उक्त आरक्षण व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेः-

उक्त मंजूर विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलांच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :–

**परिशिष्ट**

| अ.क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर विकास योजनेतील प्रस्ताव व वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणातून व्यपगत झाले अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | (चौ.मी.) |
| १. | गोंदिया नगर परिषद, मौजा कुडवा, ता. गोंदिया, जि. गोंदिया. | आरक्षण क्र. एन/२३ " प्राथमिक शाळा" एकूण अंदाजे क्षेत्र ७,००० चौ.मी. | गट क्रमांक ५२९/२, ५२९/३ | अंदाजे ५२३७ |
| २. | गोंदिया नगर परिषद, मौजा कुडवा, ता. गोंदिया, जि. गोंदिया. | १२ मी. रुंद विकास योजना रस्ता | गट क्रमांक ५२९/२, ५२९/३ | अंदाजे २२४५ |
| ३. | गोंदिया नगर परिषद, मौजा कुडवा, ता. गोंदिया, जि. गोंदिया. | १८ मी. रुंद विकास योजना रस्ता | गट क्रमांक ५२९/२, ५२९/३ | अंदाजे ११८३ |

**टीपः-** १. उक्त आरक्षणांतून मुक्त झालेल्या उक्त जमिनीच्या लगतच्या जमिनीवर उक्त मंजूर विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त रस्त्यामधून मुक्त झालेल्या उक्त जमिनींच्या भागशः क्षेत्रामुळे उक्त रस्त्याची संलग्नता खंडित होत आहे. त्यामुळे दळणवळणाच्या व लगतच्या आरक्षणासाठी संलग्नतेच्या दृष्टीकोनातून उक्त मंजूर सुधारित विकास योजनेत

प्रस्तावित केलेले उक्त जमिनींमधील क्षेत्र हे रस्त्यासाठी कायम ठेवणे आवश्यक आहे. या दृष्टीने मुख्याधिकारी, नगर परिषद, गोंदिया यांनी नियोजन प्राधिकरण म्हणून कायद्याच्या चौकटीत उक्त जमीन मालकास अन्य पर्याय देवू करुन त्यांचे सहमतीने योग्य ती कार्यवाही करावी.

३. उक्त आरक्षणांतुन मुक्त झालेल्या उक्त जमिनींचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, गोंदिया नगर परिषद, गोंदिया, जि. गोंदिया यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

४. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**जितेंद्र ल. भोपळे,**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

पुणे :
दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३२.

BY DIRECTOR OF TOWN PLANNING

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

*ORDER*

No. D.T.P-D.P.Gondia-Sec-127(2)-Order-TPV-II-6525.–

Whereas, the Development Plan of Gondia Municipal Council has been sanctioned as per the provisions of section 31 *(1)* of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") by the Government in Urban Development Department *vide* Notification No. TPS- 2311-2186-CR-249B-2011-UD-9, dt. 04th April, 2012 (hereinafter referred to as "the said Notification") & has come into force with effect from dt. 15th May, 2012, (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan");

And whereas, as per the said approved Development Plan, the area of land in Gat No. 529/2, 529/3, area 1.52 Ha. at Mouja Kudwa is affected by Reservation No. N/23 (Primary School), 12 m. and 18 m. wide Development Plan Road (hereinafter referred to as "the said Reservations") and the Planning and Appropriate Authority for the acquisition and development of the said reservations is the Municipal Council, Gondia (hereinafter referred to as "the said Appropriate Authority");

And whereas, the land affected by the said Reservation have not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Development Plan come into force;

And whereas, the concerned land owner (hereinafter referred to as "the said Land Owner") of the Land bearing Gat No. 529/2, 529/3 at Mouja Kudawa, admeasuring area 1.52 Ha., had served a notice in respect of the land affected by the said Reservations (hereinafter referred to as "the said Lands") as per the provisions of Section 127*(1)* of the said Act, (hereinafter referred to as "the said Notice") on the said Appropriate Authority on 31st December, 2022 and same has been recieved by the Appropriate Authority on 02nd January, 2023;

And whereas, the said Lands under the said Reservation is not acquired or no steps as required as per the provisions of section 127 (1) of the said Act have been taken by the Planning Authority within the stipulated period from the date of service of the said notice. by the said lands owner as per the provisions of section 127 of the said Act;

And whereas. Assistant Director of Town Planning. Gondia Branch, Gondia *vide* letter No. 741, dt. 14th October, 2025 has submitted report and finally stating that, 'The land under the said reservation was required to be acquired by the Planning Authority, N. P. Gondia, within a period of 10 years from the date of implementation of the Development Plan, *i.e.* from 15th May, 2012. However, since the said land was not acquired under Section 127*(1)* of the Maharashtra Regional and Town

Planning Act, 1966, it is seen that the applicant issued a purchase notice under Section 127 on 31st December, 2022. The said land was required to be acquired by the Municipal Council within a period of 24 months after the issuance of the purchase notice. However, since the Municipal Council has not acquired the said land. the reservation under it has lapsed. This office has no objection to issuing a notification the government regarding the lapsing of the land under reservation as per Section 127*(2)*.';

And whereas, the Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur, *vide* letter No. 1639, dated 16th October, 2025, has submitted a report and finally stated that, 'Land ownership' in Kudwa, S.No. 529/2 and 529/3 out of the total area of Reservation No. N/23 (PS) "Primary School" is lapsing as the land acquisition process has not been completed within the prescribed period of 24 months from the date of issuance of the notification for the reservation. However, as the partial area of the said land is being released from the 12.0 m. and 18.00 m. wide Development Plan road, the connectivity of the said road is being disrupted. Therefore, since the coordination of roads is necessary while granting development permission in the said Sanctioned Revised Development Plan from the perspective of communication and connectivity, it would be appropriate to take a decision at the level of the Directorate regarding the issuance of notification under section 127*(2)* of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 for the area affected by the said reservation.;

And whereas, on perusal of the copy of 'K prat' the land measurement document No. 2440/2021, dated 02nd February, 2021, received from the Chief Officer, Municipal Council, Gondia, it is seen that the area on the land of Gat No. 529/2, 529/3 at Mauja Kudwa is being affected by the Reservation No. N-23 (Primary School), 12 m. and 18 m. wide Development Plan road;

And whereas, in view of the above stated facts regarding the said Reservation on the said lands in the said Sanctioned Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that it is necessary to issue an order regarding the lapsing of the said Reservation on the said lands as per the provisions of Section 127*(2)* of the said Act;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, *vide* Resolution No.TPS-1813-3211-CR- 508/UD-13, dt.01st December, 2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (2) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for the Development Plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation in respect of the said lands as per the provisions of section 127(2) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said sanctioned Development Plan, the following new entry shall be added:–

SCHEDULE

| Sr. No. | Municipal Council Mouza, Taluka and District | Proposal in the said Sanctioned Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report | Description of the Land | Approximate Area lapsed of the said Reservation |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| | | | | (sq. mt.) |
| 1 | Gondia Municipal Council, Mouza Kudwa Tal. Gondia, Dist. Gondia. | Reservation No. N-23, "Primary School" Total Approximate Area 7000 Sq. mt. | Gat. No. 529/2, 529/3 | Apprxi. 5237 |

SCHEDULE–*Contd.*

| (1) | (2) | (3) | (4) | (5) (sq. mt.) |
|---|---|---|---|---|
| 2 | Gondia Municipal Council, Mouza Kudwa. Tal. Gondia, Dist. Gondia. | 12 m. wide Development Plan Road. | Gat. No. 529/2, 529/3 | Apprxi 2245 |
| 3 | Gondia Municipal Council, Mouza Kudwa. Tal. Gondia, Dist. Gondia. | 18 m. wide Development Plan Road. | Gat. No. 529/2, 529/3 | Apprxi 1183 |

*Note:*- 1. The said Lands so released from the said Reservation shall become available to the said Land Owner for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent Land under the said sanctioned Development Plan.

2. Contiguity of the road is broken due to partial area of the Land getting released from the said Road. Therefore, the land proposed in the Sanctioned Revised Development Plan for road to be retained from the perspective of transporation and connectivity to the adjacent reservation. In this regard, the Chief Officer. Municipal Council, Gondia as a Planning Authority should take appropriate action in the framework of law by offering any other alternative to the said Land owner with his consent.

3. A copy of the part plan of the said sanctioned Development Plan showing the areas of the said Lands which are lapsed from the said Reservation is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Gondia, District Gondia during office hours on all working days for inspection to public upto one month.

4. This Order shall also be published on the Directorate's official website. *www.dtp.maharashtra.gov.in.*

JITENDRA L. BHOPLE,
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.

Pune :
Dated the 4th November, 2025.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३३.

## सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगर रचना, यांजकडून

### महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (३) अन्वये

### सूचना

क्र. प्रा. यो. चंद्रपूर-बल्लारपूर-कलम २०(३) मौजा खटाळा-ता. चंद्रपूर-स.क्र. ८-१, ८-२, ८-३, व ८-४ सहसंचानाग १७४४ :—

ज्याअर्थी, चंद्रपूर-बल्लारपूर प्रदेशाची प्रादेशिक योजना (यापुढे "उक्त प्रादेशिक योजना " असे संबोधिले आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६चा महा ३७ वा) (यापुढे "उक्त अधिनियम " असे संबोधिले आहे) चे कलम-१५ अन्वये शासनाचे नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस-२२८४-४८४-प्र.क्र.-१३५-नवि-९, दिनांक १८ नाव्हेंबर, १९९१ अन्वये मंजूर झाली असून ती दिनांक ०१ फेब्रुवारी, १९९२ पासून अंमलात आली आहे;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागण्याऱ्या जमीन वापराच्या फेरबदला संदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अंतर्गत शासन निर्णय

क्र. टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ०६ मे, २०१५ अन्वये शासनाने निदेश दिलेले आहेत व शासन निर्णय क्रमांक टिपीएस-१८१५-प्र.क्र.४९-१५-नवि-१३, दिनांक ०४ जानेवारी, २०१६ अन्वये उक्त कार्यपद्धतीसंबंधी सुधारित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच उक्त अधिनियमाचे कलम १५१ (१) अन्वये प्राप्त शक्तींचा वापर करुन, शासनाचे समक्रमांकाचे दिनांक ०६ मे, २०१५ चे अधिसूचने अन्वये उक्त अधिनियमाचे कलम २०(३) व २०(४) चे शासनाने वापरावयाचे अधिकार,उक्त अधिसूचनेत नमूद अटींचे अधिन राहुन, नागपूर प्रशासकीय विभागाकरीता सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर यांना प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, मंजूर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावित जमीन वापर नकाशानुसार मौजा खुटाळा, ता. जि. चंद्रपूर येथील स.क्र. ८/१, ८/२, ८/३, व ८/४, एकूण क्षेत्र ७.०० हे. आर जागा (यापुढे ज्यास “उक्त क्षेत्र” असे संबोधले आहे) प्रादेशिक योजनेच्या “कृषी विभागात” समाविष्ट आहे;

आणि ज्याअर्थी, मा. संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेऊन शासनाचे पूर्व मान्यते नंतर उक्त अधिनियमाचे कलम -२० पोट-कलम (२) मधील तरतूदीनुसार “उक्त क्षेत्र” “कृषी” विभागातून वगळून, “रहिवास” विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित असल्याचे खालीलप्रमाणे अटींचे अधीन राहून, उक्त शासन निर्णयान्वये गठीत प्रस्ताव छाननी समितीचे मत झाले आहे.

**अटी व शर्ती :-**

(i) शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय दिनांक ०४ जानेवारी, २०१६ रोजीच्या शासन निर्णयात नमूद प्रमाणे प्रस्तुतच्या विभाग बदलासाठी आवश्यक ते अधिमूल्य व इतर शुल्क भरणा करणे जमीन मालकांवर/विकासकर्त्यांवर बंधनकारक राहील.

(ii) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील प्रादेशिक योजनांसाठी नियमानूसार किमान १०% खुली जागा व १०% सुविधा क्षेत्र सोडणे आवश्यक राहील.

(iii) सदर जागेवरील संभाव्य लोकसंख्येकरीता आवश्यकतेप्रमाणे पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्धता करणे ही जमीन मालकांची जबाबदारी राहील. त्याकरिता, वरिष्ठ भूवैज्ञानिक भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, चंद्रपूर यांचे पत्र क्र. ९१६, दिनांक २२ ऑगस्ट, २०२४ व पत्र क्र. ९८९, दिनांक १८ सप्टेबर, २०२५ मध्ये प्रस्तावित ४ विंधण विहीरी व २ नविन विहीरी (डग कम बोअर) त्यातील इनवेल बोअर, सदर इनवेल बोअरचे केसींग तळापासून ३.०० मी. उंच ठेवावे, याप्रमाणे खोदकास केल्यास उपरोक्त सहा (०६) स्त्रोतांपासून अंदाजे १,६०,००० लिटर प्रतिदिन भूजल उपलब्ध होण्याची शक्यता आहे. असे नमूद आहे. त्याची पूर्तता अर्जदाराने केल्यानंतर, जिल्हाधिकारी चंद्रपूर यांची खात्री झाल्यानंतरच अंतिम अभिन्यास मंजूर करावा.

(iv) पायाभूत सुविधा जमीन मालकांनी/विकासकर्त्यानी जिल्हाधिकारी चंद्रपूर ठरवतील त्या मानकांनुसार स्वतःचे खर्चाने विकसीत करणे व पुरविणे बंधनकारक राहील.

(v) विभाग बदल प्रस्ताव समितीतर्फे मान्य झाल्यानंतर शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ०६ मे, २०१५ रोजीच्या निर्णयासोबतच्या 'अनुसूची-क' अभिन्यासातील भूखंड/सदनिका यांच्या विक्रीची सांगड घालण्यासाठी विहीत केलेल्या खालीलप्रमाणे अटी लागू राहतील.

| | | |
|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमतः मंजूर झाल्यावर | एकूण २५% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ५०% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ७५% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८०% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण ९०% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १००% मुलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | एकूण १००% भूखंड/सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

(vi) फेरबदलखालील जमिनीमध्ये समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल तर, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी विहीत केल्यानूसार सर्व मुलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय जमीन मालक/विकासकर्ता यांना भोगवटा प्रमाण पत्र देता येणार नाही.

(vii) एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदीनुसार, नाल्यापासून उचित जागा सोडणे आवश्यक राहील.

आता, ज्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या अधिकारानुसार, उक्त अधिनियमाच्या कलम २० पोट-कलम (३) अन्वये प्रस्तावीत फेरबदलाच्या अनुषंगाने नागरीकांकडून हरकती आणि/किंवा सूचना योग्य त्या कारणांसह, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसांचे मुदतीत लेखी स्वरुपात मागविण्यात येत आहे;

हरकती आणि/किंवा सूचना सहायक संचालक, नगर रचना, चंद्रपूर शाखा, चंद्रपूर, पत्ता-चव्हाण रॉयल्स, दुसरा माळा, सरकार नगर, अग्रवाल कोचिंग क्लासेस समोर, चंद्रपूर, ४४२ ४०१ यांच्याकडे पाठविण्यात याव्यात. विहीत मुदतीत प्राप्त होणाऱ्या सूचन-ा/हरकतींवर सुनावणी देण्यासाठी व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, चंद्रपूर यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

प्रस्तवित फेरबदलाची सूचना खालील कार्यालयामध्ये कामकाजाच्या दिवशी एक महिन्याचे कालावधीकरीता सर्वसामान्य जनतेच्या अवलोकनार्थ उपलब्ध राहील.

(१) जिल्हाधिकारी, चंद्रपूर.

(२) सहसंचालक, नगर रचना, नागपूर विभाग, नागपूर.

(३) सहायक संचालक, नगर रचना, शाखा कार्यालय, चंद्रपूर.

सदर सूचना **www.maharashtra.gov.in व www.dtp.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

**विजय बा. शेंडे,**
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती
तथा
सहसंचालक, नगर रचना,
नागपूर विभाग, नागपूर.

नागपूर :
दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३४.

BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

**Under Section 20(3) of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

*NOTICE*

No. R.P Chandrapur-Ballarpur-Section 20 (3)- Mouza Khutala-Tah. Chandrapur-Survey No. 8-1, 8-2, 8-3, & 8-4,-JDTPDN-1744-2025.–

Whereas, the Regional Plan of Chandrapur-Ballarpur Region (hereinafter referred to as "the said Regional Plan") has been sanctioned by the Government *vide* Urban Development Department's Notification No. TPS-2284-484-CR-135-UD-9, dated the 18th November, 1991 under section 15 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") and has came into force with effect from the 01st february, 1992;

And whereas, the Government *vide* Resolution No. TPS 1815-CR-49-15-UD-13, dated 6th May, 2015 issued directives under section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans under the said Act, and issued Order to follow revised procedure related to above directives *vide* Government Resolution No. TPS-1815-C.NO.49-15-UD-13, Dated 04th January, 2016; and in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of Section 151 of the said Act, the Government, *vide* its notification No.TPS-1815-CR-49-15-UD-13, Dated 06th May, 2015, delegated the powers exercisable by it under the provisions of Section 20 *(3)* & 20 *(4)* of the said Act,

subject to conditions mentioned therein, to the Divisionl Joint Director of Town Planning Nagpur for Nagpur Administrative Division;

And whereas, land bearing survey no. 8/1, 8/2, 8/3 & 8/4 of Mouza Khutala, Tah. Chandrapur, District Chandrapur, total land admeasuring approx. 7.00 hectare (hereinafter referred to as "the said Area") is included in 'Agriculture Zone' of proposed Land Use Plan in the sanctioned Regional Plan of Chandrapur-Ballarpur;

And whereas, the "Proposal Scrutiny Committee" established under the above mentioned Government Resolution, after consulting to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune and taking prior approval from Government, is of the opinion that the said area proposed to be deleted from "Agriculture Zone" and proposed to be included in "Residential Zone" in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 20 of the said Act, subject to following conditions.—

**Terms & Conditions :-**

(i) It will be binding for the Applicant to Pay Requisite Premium and other fees and to follow conditions laid down in the above said Government Resolution dated 04th January, 2016.

(ii) It is mandatory to provide 10% Open Space and 10% Amenity Space in the lay-out as required by the provision for Regional Plan in Unified Development Control & Promotion Regulations (UDCPR).

(iii) It will be the responsibility of the land Owners/Developers to provide sufficient water as required by the potential population on the said land. For that, As per the Senior Geologist Groundwater Survey and Development Agency, Chandrapur's, letter No. 916, dated 22nd August, 2024 and letter No. 989, dated 18th September, 2025, it is stated that from 4 proposed borewells and 2 proposed new wells (dug cum bore) inwell bore shall be kept at 3.00 M. height from the base of in-well bore casing and if dug out in this manner, from above 6 sources there is possibility of availability of ground water approx. 1,60,000 lit/day. Hence, the final lay-out shall be sanctioned only after when the applicant fulfils this condition and due verification by District Collector, Chandrapur.

(iv) It will be binding upon land Owners/Developers to Develop and provide basic Amenities at their own cost as per the specifications decided by the Collector, Chandrapur.

(v) After the approval of the Committee, Following Conditions prescribed for the sale of plot/ flat with the development of basic amenities in lay-out mentioned in the affidavit, in the proforma 'Schedule- C' (Annexure of Govt. resolution dated 06th May, 2015) submitted with the application shall be applicable.—

| | | |
|---|---|---|
| A | After final sanction of Lay-out | Sale of 25% plot/flat will be permissible |
| B | After completion of approx. 40% Basic Amenities | Sale of 50% plot/flat will be permissible |
| C | After completion of approx. 60% Basic Amenities | Sale of 75% plot/flat will be permissible |
| D | After completion of approx. 80% Basic Amenities | Sale of 90% plot/flat will be permissible |
| E | After completion of approx. 100% Basic Amenities | Sale of 100% plot/flat will be permissible |

(vi) If a group housing scheme is to be developed on the land under modification proposal, occupancy certificate shall not be issued to the Land owner /Developers unless all basic Amenities are developed as prescribed by the Collector, Chandrapur.

(vii) As per the provisions of the Unified Development Control & Promotion Regulations (UDCPR), it will be necessary to maintain an adequate distance from the drain.;

Now, therefore, in exercise of the power delegated by the Govt. in this regard, suggestions and/or objections with reasons are invited from General Public in accordance with Notice u/s 20*(3)* of said Act, in respect of proposed modification within 30 days from the date of publication of this notice in the Maharashtra Government Gazette;

The suggestions and/or objections shall be addressed to the Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur, Chavhan royals, 2nd floor, Sarkar nagar, infront of Agrawal coaching classes, Chandrapur, 442 401. Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur is duly authorized to hear the suggestions and/or objections received within the stipulated period and to submit the report thereon.

The plan showing the proposed modification is kept open for inspection to the public during office hours on all working days for a period of one month in the following offices:-

(1) Collector, Chandrapur.

(2) Joint Director of Town Planning, Nagpur Division, Nagpur.

(3) Assistant Director of Town Planning, Chandrapur Branch, Chandrapur.

This notice is also available on website *www.maharashtra.gov.in and www.dtp.maharashtra.gov.in.*

Nagpur :
Dated the 11th November, 2025.

VIJAY B. SHENDE,
Member Secretary,
Proposal Scrutiny Committee
And
Joint Director of Town Planning,
Nagpur Division, Nagpur.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३५.

**मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, यांजकडून**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अंतर्गत नविन चंद्रपूर शहराच्या विकास आराखड्यात फेरबदल**

**जाहीर सूचना**

क्रमांक विनिप्रा-चंद्रपूर-ससंनर-६६४८-२०२५.—

नविन चंद्रपूर विकास योजना मा. उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे आदेश क्र. व्ही.पी.एस-२२९४-४७१-१५-सी-युडी-९, दिनांक ३० जून, १९९८ मंजूर केली असून हि विकास योजना दिनांक ०१ सप्टेंबर, १९८८ पासून अंमलात आलेली आहे. या विकास योजनेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्याचे प्राधिकरणाच्या बैठकीत दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या बाब क्र ३०१-११ बैठकीतील स्थायी ठराव क्र. ७१३०, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ या निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**तक्ता**

| अ.क्र. | मौजा | स.क्र. | मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण प्रस्ताव | कलम ३७ (१) अंतर्गत फेरबदलाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | पडोली | ४४/२ | आ.क्र. १०, ट्रक टर्मिनल्स | आ.क्र. १०, ट्रक टर्मिनस आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत (अंदाजित क्षेत्र ०.९६ हे. आर) |

फेरबदल दर्शविणारे नकाशे विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर च्या कार्यालयात कार्यालयीन वेळात जनतेच्या अवलोकनार्थ ठेवलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये जाहिर करण्यात येते की, उपरोक्त फेरबदलाबाबत कोणाचे आक्षेप व सूचना असतील तर त्यांनी हि सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जमीन मालकांनी/पोट हिस्सेधारकांनी मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे लेखी स्वरूपात सादर कराव्यात.

दिनांक ६ नोव्हेंबर, २०२५.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३६.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अंतर्गत नविन चंद्रपूर शहराच्या विकास आराखड्यात फेरबदल**

**जाहीर सूचना**

क्रमांक विनिप्रा-चंद्रपूर-ससंनर-६८१४-२०२५.—

नविन चंद्रपूर विकास योजना मा. उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे आदेश क्र. व्ही.पी.एस-२२९४-४७१-१५-सी-युडी-९, दिनांक ३० जून, १९९८ मंजूर केली असून हि विकास योजना दिनांक ०१ सप्टेंबर, १९८८ पासून अंमलात आलेली आहे. या विकास योजनेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्याचे प्राधिकरणाच्या बैठकीत दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या बाब क्र ३०१-१३ बैठकीतील स्थायी ठराव क्र. ७१३२, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ या निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**तक्ता**

| अ.क्र. | मौजा | स.क्र. | मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण प्रस्ताव | कलम ३७ (१) अंतर्गत फेरबदलाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | दाताळा | २७०/1 | अविकसित क्षेत्र (ग्रीन झोन) | अविकसित क्षेत्र (ग्रीन झोन) आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत (अंदाजित क्षेत्र १.१७ हे. आर) |

फेरबदल दर्शविणारे नकाशे विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर च्या कार्यालयात कार्यालयीन वेळात जनतेच्या अवलोकनार्थ ठेवलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये जाहिर करण्यात येते की, उपरोक्त फेरबदलाबाबत कोणाचे आक्षेप व सूचना असतील तर त्यांनी हि सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जमीन मालकांनी /पोट हिस्सेधारकांनी मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे लेखी स्वरूपात सादर करावयात.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३७.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अंतर्गत नविन चंद्रपूर शहराच्या विकास आराखड्यात फेरबदल**

**जाहीर सूचना**

क्रमांक विनिप्रा-चंद्रपूर-ससंनर-६८१६-२०२५.—

नविन चंद्रपूर विकास योजना मा. उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय यांचे आदेश क्र. व्ही.पी.एस-२२९४-४७१-१५-सी-युडी-९, दिनांक ३० जून, १९९८ मंजूर केली असून हि विकास योजना दिनांक ०१ सप्टेंबर, १९८८ पासून अंमलात आलेली आहे. या विकास योजनेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे फेरबदल करण्याचे प्राधिकरणाच्या बैठकीत दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या बाब क्र ३०१-१२ बैठकीतील स्थायी ठराव क्र. ७१३१, दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ या निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे फेरबदल प्रस्ताव प्रस्तावित करण्यात येत आहे.

**तक्ता**

| अ.क्र. | मौजा | स.क्र. | मंजूर विकास योजनेनुसार आरक्षण प्रस्ताव | कलम ३७ (१) अंतर्गत फेरबदलाचा प्रस्ताव |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | पडोली | ४२ | आ.क्र. १०, ट्रक टर्मिनल्स | आ.क्र. १०, ट्रक टर्मिनस आरक्षणातून वगळून रहिवास विभागात समाविष्ट करण्याबाबत (अंदाजित क्षेत्र २.२८ हे. आर) |

फेरबदल दर्शविणारे नकाशे विशेष नियोजन प्राधिकरण, चंद्रपूर व नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर च्या कार्यालयात कार्यालयीन वेळात जनतेच्या अवलोकनार्थ ठेवलेला आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये जाहिर करण्यात येते की, उपरोक्त फेरबदलाबाबत कोणाचे आक्षेप व सूचना असतील तर त्यांनी हि सूचना वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत जमीन मालकांनी/ पोट हिस्सेधारकांनी मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, नागपूर यांचेकडे लेखी स्वरूपात सादर करावयात.

**डॉ. विजय इंगोले,**
मुख्य अधिकारी,
नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
नागपूर.

नागपूर :
दिनांक ११ नोव्हेंबर, २०२५.

---

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३८.

**मुख्याधिकारी, नगर परिषद, यांजकडून**

**जाहिर सूचना**

क्रमांक वशिक्र.-नपमु-नियोजन वि.-३१००-२०२५.—

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक. टीपीएस-२२९८-४४३-प्र.क्र.१०२-९८-नवि- ९, दिनांक २५ ऑक्टोबर, २००१ अन्वये विकास योजना मुल भागशः मंजूर असून ती दिनांक १५ डिसेंबर, २००१ पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना शासन निर्णय क्र. २४१४-९९-प्र.क्र.५८-२०१४-नवि-९, दिनांक १० मार्च, २०१५ अन्वये मंजूर झालेली आहे.

नगर परिषद मुलने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये उपरोक्त मंजूर विकास योजना मुल मध्ये खाली दर्शविलेल्या तपशीलाप्रमाणे किरकोळ फेरबदल करण्याचे प्रस्तावित केले आहे.—

**विवरण**

| अ. क्र. | मौजा/सर्व्हे क्र. | क्षेत्रफळ/आराजी | विकास योजनेतील सध्याचा वापर | फेरबदल केल्यानंतर प्रस्तावित वापर | नगरपरिषद सर्वसाधारण सभा दिनांक | ठराव क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३)<br>हे. आर | (४) | (५) | (६) | (७) |
| १ | मौजा- मुल<br>सर्व्हे क्र. ४६० | ०.७६ | कृषी क्षेत्र | रहिवास वापर | २९ ऑक्टोबर, २०२५ | १ |
| २ | मौजा- मुल<br>सर्व्हे क्र. ४६२ | ०.४० | कृषी क्षेत्र | रहिवास वापर | २९ ऑक्टोबर, २०२५ | २ |

उपरोक्त फेरबदल दर्शविणारा नकाशा मुल नगर परिषदेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत सर्व जनतेस अवलोकनार्थ उपलब्ध आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) नुसार अशी जाहिर सुचना देण्यात येते की, नियोजीत फेरबदलासंबंधी जर कोणत्याही व्यक्तीला आक्षेप वा सूचना सुचवायच्या असतील तर त्यांनी ही सूचना, महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत (३० दिवसात) मुख्याधिकारी, नगर परिषद, मुल यांचेकडे लेखी सादर कराव्यात. जेणेकरून उक्त कालावधीत आलेल्या सूचना व आक्षेपावर विचार करून नियोजित फेरबदलाचा प्रस्ताव (कोणत्याही सुधारणा असल्यास त्यासह) मंजुरीसाठी राज्य शासनाकडे सादर करता येईल.

**संदीप दोडे,**
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुल.

मुल :
दिनांक ०७ ऑक्टोबर, २०२५.

भाग १-अ (ना. वि. पु.) म. शा. रा., अ. क्र. ३३९

BY CHIEF OFFICER, MUNICIPAL COUNCIL

*PUBLIC NOTICE*

No.-MCM-Planning dep-3100-2025.—

Government of Maharashtra, Urban Development Department *vide* there Notification No.TPS-2298-443-CR-102-98-UD-09, Dated 25th October, 2001 sanctioned, part of the Development Plan of Mul, has come into force from dated 15th December,2001 and Excluded parts of the said Development Plan sanctioned *vide* Government Notification No. TPS 2414-99-CR-58-2014-UD-09, Dated 10th March, 2015.

The Municipal Council, Mul proposed to make minor modificatio n in the aforesaid Sanctioned Development Plan under section 37 *(1)* of the Maharashtra Regional And Town Planning Act, 1966.

The Details about Proposed minor modification are as below.----

DESCRIPTION

| Sr. No. | Mouza/Survey No. | Area in | Present Use in D.P. | Proposed use after Modification | Municipal Council Special Meeting Date | Resolution No. |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) |
| 1 | Mouza- Mul Survey No. 460 | 0.76 | Agriculture Zone | Residential | 29th October, 2025 | 1 |
| 2 | Mouza - Mul Survey No. 462 | 0.40 | Agriculture Zone | Residential | 29th October, 2025 | 2 |

The plan showing the above proposed modification is kept open in the office of Municipal Council, Mul during the office time for perusal of Public.

Now, in pursuance of Section 37 *(1)* of the Maharashtra Regional And Town Planning Act, 1966, It is hereby notified that any suggestion or objection to the proposed modification as details above shall communicate the same in writing to the Chief Officer, Municipal Council, Mul within period of the month (30 days) from the date of notification published in the *Gazette Government of Maharashtra*.

The objection or suggestion if any received within above period will be considered before submitting to the proposal to the Government for Sanction.

SANDIP DODE,
Chief Officer,
Municipal Council, Mul.

Mul :
Dated the 7th October, 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.